आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१८ एप्रिल २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात उद्या १७ राज्यं आणि चार केंद्रशासित प्रदेशांमधल्या १०२ मतदारसंघांमध्ये १ हजार ६२५ उमेदवारांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद होणार

- चौथ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात

- महाराष्ट्रातल्या रत्नागिरी सिंधुदुर्ग मतदारसंघात भाजपाची उमेदवारी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना जाहीर

- उद्योगपती राज कुंद्रांच्या ९८ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर ईडीची टाच

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात रंगणार

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात उद्या १७ राज्यं आणि चार केंद्रशासित प्रदेशांमधल्या १०२ मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, अंदमान आणि निकोबार, लक्षद्वीप, पुदुच्चेरी, उत्तराखंड आणि तमिळनाडूमधल्या सगळ्या लोकसभा मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होईल. याशिवाय राजस्थानमधल्या १२, उत्तर प्रदेशातल्या आठ, मध्य प्रदेशातल्या सहा, आसाम आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येकी पाच, पश्चिम बंगालमधल्या तीन, मणिपूरमधल्या

दोन, तसंच छत्तीसगड, त्रिपुरा आणि जम्मू-काश्मीरमधल्या प्रत्येकी एका मतदारसंघामध्ये मतदारांचा कौल मतदान यंत्रात नोंदवला जाईल. या टप्प्यात, १ हजार ६२५ उमेदवार रिंगणात आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, तेलंगणचे माजी राज्यपाल तमिलीसाई सुंदरराजन, भाजपाचे तमिळनाडू प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई, काँग्रेसचे नेते कार्ती चिदंबरम, द्रमुकचे नेते दयानिधी मारन यांच्यासह अनेक दिग्गजांचं निवडणुकीतलं भवितव्य उद्या निश्चित होणार आहे.

प्रचाराच्या कालच्या शेवटच्या दिवशी प्रचार मोहीम शिगेला पोचली होती. सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी ठिकठिकाणी प्रचार सभा घेतल्या. तसंच उमेदवारांनी मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेण्यावर भर दिला. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याबरोबर अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभांसाठीही शुक्रवारी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. त्यासाठीही जय्यत तयारी करण्यात आली आहे.

**<><><><><>**

मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा आणि लोकशाहीतलं उत्तरदायित्व दाखवून द्यावं असं आवाहन देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी केलं आहे. युवकांनी निवडणूक सहभागाच्या क्रांतीचं नेतृत्व करावं, असं ते आकाशवाणीशी बोलताना म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या उद्याच्या मतदानाचा आढावा घेणारा ‘मतदानाचा मागोवा’ हा विशेष रेडिओ ब्रिज कार्यक्रम आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक

वृत्तविभागातर्फे उद्या सादर करण्यात येणार आहे. उद्या संध्याकाळी सव्वा आठ वाजता आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठीच्या चौथ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी होणार आहे. या टप्प्यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ९६ मतदारसंघांमध्ये १३ मे रोजी मतदान होणार आहे.

महाराष्ट्रात नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या अकरा मतदारसंघात १३ मे रोजी मतदान होणार आहे. आंध्र प्रदेश आणि ओडिशातल्या विधानसभा निवडणुकीसाठी उद्या अधिसूचना जारी होईल. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत उद्या संपेल. या टप्प्यात ९४ मतदारसंघांमध्ये सात मे रोजी मतदान होणार आहे.

<><><><><>

वीवीपॅट पावतीचं मतदान यंत्रांबरोबर मतांची १०० टक्के पडताळणी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात आज पुन्हा सुनावणी सुरू झाली आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स आणि इतरांनी दाखल केलेल्या याचिकांवर न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांचा समावेश असलेल्या पीठासमोर सुनावणी सुरू झाली आहे. सर्व विवीपॅट पावत्या पडताळण्यात व्यावहारिक अडचणी येणार

असल्याचं निवडणूक आयोगानं या याचिकेला उत्तर देताना, सांगितलं. तत्पूर्वी, सर्वोच्च न्यायालयानं परवा सुनावणी दरम्यान मतपत्रिकांव पेपरवर मतदानाची सुचना फेटाळली.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून भाजपानं केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. लोकसभा निवडणुकीसाठी भाजपानं आज आपली १३वी यादी जाहीर केली. त्यात राणे यांचा नावाचा समावेश आहे. राणे यांची लढत महाविकास आघाडीच्या विनायक राऊत यांच्याबरोबर होणार आहे.

<><><><><>

आज उद्योगपती राज कुंद्रा यांच्या ९८ कोटी रुपयांची मालमत्तेवर ईडी नं अर्थात सक्तवसुली संचालनालयाने टाच आणली आहे. यामध्ये त्यांच्या आणि त्यांची पत्नी शिल्पा शेट्टी यांच्या मालकीच्या निवासी सदनिका आणि समभागांचा समावेश आहे. मनीलॉण्डरिंग प्रकरणी ईडीनं ही कारवाई केली आहे.

<><><><><>

चित्रपट अभिनेता सलमान खान याच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणी महाराष्ट्र पोलिस अनमोल बिश्नोई च्या विरोधात लुकआऊट नोटीस जारी करणार आहे. अनमोल हा कुख्यात गुंड लारेंस बिश्नोई याचा भाऊ आहे. त्याच्या विरोधात ठोस पुरावे मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला

सहआरोपी घोषित केलं आहे. अनमोल सध्या परदेशात असून आरोपींनी त्याच्याशी इंटरनेट दूरध्वनीच्या माध्यमातून संभाषण केलं होतं.

**<><><><><>**

अंतराळ क्षेत्रात १०० टक्क्यांपर्यंत परदेशी गुंतवणुकीला परवानगी देण्यासाठी केंद्र सरकारनं परकीय चलन व्यवस्थापन कायद्यांतर्गत सुधारित नियम अधिसूचित केले आहेत. अर्थ मंत्रालयानं जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, उपग्रह, उपग्रह डेटा उत्पादन, जमिनीचा भाग आणि वापरकर्ता विभाग यांच्या निर्मिती आणि कार्यान्वयासाठी १०० टक्के थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली आहे, त्यापैकी ७४ टक्केपर्यंतच्या गुंतवणुकीसाठी सरकारची परवानगी घेण्याची गरज नाही. तसंच प्रक्षेपण वाहनं, संबंधित यंत्रणा किंवा उपप्रणाली आणि अंतराळ यान प्रक्षेपण करण्यासाठी त्याचप्रमाणे अंतराळ तळ तयार करण्यासाठी ४९ टक्क्यांपेक्षा जास्त परदेशी गुंतवणूक असल्यास सरकारची परवानगी आवश्यक असेल, असंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. नवीन नियम गेल्या १६ तारखेपासून लागू झाले आहेत.

**<><><><><>**

पुढच्या चार दिवसांमध्ये ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये उष्णतेची लाट तीव्र होण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागानं वर्तवला आहे. झारखंड, उत्तर कोकण, सौराष्ट्र, मध्य महाराष्ट्र, आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीचा भाग, तेलंगण, तमिळनाडू आणि पुदुच्चेरीमध्येही उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. देशाच्या पूर्व तसंच दक्षिण भारतातल्या किनारपट्टीच्या भागांमध्ये कमाल तापमान दोन ते तीन अंश सेल्सिअसनं वाढेल तर ईशान्य भारतात

पुढच्या रविवारपर्यंत विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज आहे. जम्मू, काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामानशास्त्र विभागानं वर्तवला आहे.

**<><><><><>**

केरळमध्ये अलप्पुळा जिल्ह्यातील दोन पंचायतींमध्ये बदकांना H5N1 बर्ड फ्लू झाल्याची पुष्टि झाली आहे. बाधित भागाच्या एक किलोमीटर त्रिज्येतील सर्व पाळीव बदकं मारण्याची कार्यवाही जिल्हा प्रशासनानं सुरु केली आहे. भोपाळमधील राष्ट्रीय प्राणी रोग संस्थेनं केरळमधील बर्ड फ्लूची पुष्टि केली आहे.

**<><><><><>**

काश्मिरात काल अनंतनाग जिल्ह्यातल्या बिजबेहरा भागात दहशतवाद्यांनी बिहारमधल्या एका मजुराची गोळ्या घालून हत्या केली. या घटनेनंतर सुरक्षा दलांनी त्या परिसरात नाकाबंदी केली असून दहशतवाद्यांना पकडण्यासाठी मोठी शोधमोहीम राबवण्यात येत आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना होणार आहे. पंजाब इथल्या महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर संध्याकाळी साडे सात वाजता हा सामना सुरू होईल.

**<><><><><>**

कॅनडात टोरांटो इथं सुरु असलेल्या फिडे कैडिडेट्स बुद्धीबळ स्पर्धेत भारताच्या के.डी. गुकेश याने आपला सामना अनिर्णित राखला. ११ व्या फेरीत त्याने अमेरिकेच्या फैबियानो कारुआना याच्या बरोबरचा सामना अनिर्णित राखत संयुक्तपणे दुसरं स्थान पटकावले. रशियाच्या इयान नेपोम्नियाशी नं भारताच्या विदित गुजरातीला हरवत प्रथम स्थान पटकावलं. दूसऱ्या एका सामन्यात मे.जी.एम. हिकारु नाकामुरा यानं भारताच्या के.आर. प्रज्ञानंद याचा पराभव करत संयुक्तपणे दूसरं स्थान मिळवलं.

//<><><><><>//